मतिमंद या प्रवर्गातील कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहायक अनुदाने (वेतन) निधी वितरण करणेबाबत.
गंभीरचंद उमेदचंद शाहा मीरा विद्यालय (मतिमंद) मुलींची शाळा, मुंबई १९
(सातवा वेतन आयोग फरक)

महाराष्ट्र शासन
दिव्यांग कल्याण विभाग
शासन ज्ञापन, क्रमांकः- दिव्यांग-२०२५/प्र.क्र.३७/E- १४७६४७५/कार्या-९

३१,३२,३५ ए, मित्तल टॉवर, ए-विंग,तिसरा मजला,
बॅरीस्टर रजनी पटेल मार्ग, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.
दिनांक: - ७ जानेवारी, २०२६

**संदर्भ :-**
१. वित्त विभागाचे दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन अधिसूचना.
२. वित्त विभागाची रोजीच्या शासन परिपत्रक क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९ दिनांक २० फेब्रुवारी, २०१९.
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय क्र.इडीडी-२०१९/प्र.क्र.१२०/ दि.क.१, दि.२३ एप्रिल, २०२१
४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-२०२२/प्र.क्र.१०/ दि.क.२, दि.१३ सप्टेंबर, २०२२
५. विभागाचे क्र. दिव्यांग-२०२४/प्र.क्र.१३५/दि.क.२, दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ रोजीचे पत्र.
६. आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांचे क्र.१५२८९७८, दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजीचे पत्र.

**ज्ञापन :-**

दिव्यांगांच्या विशेष अशासकीय शाळा / कार्यशाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतन तसेच वेतनेतर थकबाकी अदा करण्यापूर्वी अवलंबवयाच्या विहित कार्यपद्धतीबाबत संदर्भ क्र. १ येथील दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये निदेश देण्यात आले असून संदर्भ क्र. २ येथील दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ च्या पत्रान्वये विहित करण्यात आलेल्या तपासणी सूचीनुसार प्रस्ताव तपासून सादर करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. केंद्र शासनाने शासकीय कर्मचारी यांना दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतनश्रेणी (सातवा वेतन आयोग) लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांबरोबर शासकीय शाळांतील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन संरचना लागू करण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २०१९ च्या दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये अधिसूचित केले आहे. तसेच वित्त विभागाच्या दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार प्रारंभिक वेतन निश्चिती व थकबाकी अदा करण्यासंदर्भात सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.त्यानुसार तत्कालीन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २३ एप्रिल, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिव्यांग कल्याण विभागांतर्गत राज्यातील स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या शासन मान्य व अनुदान प्राप्त अशासकीय दिव्यांगांच्या निवासी/ अनिवासी विशेष शाळा/ कर्मशाळा व मतिमंद

बालगृहे यामधील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सातव्या वेतन आयोगाची सुधरित वेतन संरचना मंजूर करण्यात आली आहे.

तसेच या आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेमुळे होणारा अतिरिक्त खर्च शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशिर्षासाठी खर्ची घालण्यात येतो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा, असे निर्देश सदर शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

३. त्यानुसार आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांचेकडून विभागास प्राप्त झालेल्या गंभीरचंद उमेदचंद शाहा मीरा विद्यालय (मतिमंद) मुलींची शाळा, मुंबई १९ या शाळेच्या थकीत वेतन अनुदानाच्या (सातवा वेतन आयोग फरक) प्रस्तांवास अनुसरुन मतिमंद या प्रवर्गातील व्यक्तींसाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य (कार्यक्रम), ३६- सहायक अनुदाने (वेतन) अनुदानाकरीता पुढीलप्रमाणे निधी वितरित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | शाळेचे नाव | कर्मचाऱ्याचे नावे | वितरीत निधी रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | २२३५डी०८८<br>३६ सहायक अनुदाने (वेतन) | गंभीरचंद उमेदचंद शाहा मीरा विद्यालय (मतिमंद) मुलींची शाळा, मुंबई १९ | श्री जगन्नाथ जाधव<br>(विशेष शिक्षक) | ५,७५,१६१/-<br>(सातवा वेतन आयोग फरक) |
| | | | श्री विजयकुमार माळी<br>(कला शिक्षक) | ३,७७,१७०/-<br>(सातवा वेतन आयोग फरक) |
| | | एकूण | | **९,५२,३३१/-** |

४. सदर निधी खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे नियंत्रक अधिकारी म्हणून राहतील. तसेच सदर निधी नियमानुसार संबंधितांना अदा करण्यात यावा.

५. नियंत्रक अधिकारी यांनी वितरित केलेला निधी खर्च झाल्यानंतर त्याबाबतचे विवरण व उपयोगिता प्रमाणपत्र १ महिन्यात शासनास सादर करावे.

६. निधी वितरण करतांना कर्मचारी सेवाभरती नियमांची खातरजमा करावी. तसेच उक्त शाळांचा निधी वितरण करतांना संबंधितांनी शाळेची कर्मचारी बिंदुनामावली आणि पदभरती जाहिरातींची तपासणी करावी. तसेच शाळेस मान्यता/अनुज्ञाप्ती अस्तित्वात असलेल्या कालावधीचे शाळेतील ज्या कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष काम केले नसेल तर त्यांच्या प्रकरणी शासनाचे ( No Work No Pay ) तत्व लागू राहील. त्यानुसार निधी वितरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त अन्य बाब निर्दशनास आल्यास संबंधितांकडून वसुली करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

७. सातवा वेतन आयोगाचा फरकाचे देयके सादर करतांना वेतननिश्चितीच्या अनुषंगाने तपासणी करण्यात यावी. त्यानुसार थकीत वेतन देयके सादर करावे.

८. नियंत्रक अधिकारी यांनी निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, शाळा संहिता व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकीमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन विभाग, वित्त विभाग तसेच या विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलीत निकष, वित्तीय अधिकाराचे प्रत्यायोजन तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

९. ज्या उद्देशासाठी निधी / अनुदान मंजूर आहे त्या व्यतिरिक्त इतर उद्देशासाठी खर्च करता येणार नाही. तसेच इतर लेखाशीर्षाकडे निधी वळता करता येणार नाही.

१०. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०१०७१८२६३३११३५ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरी साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNANDA MOHANRAO GHADYALE

Digitally signed by SUNANDA MOHANRAO GHADYALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=FD89208CBC27B202C96467165AC5BC9643515D80BA9EDECAF650DAD6E8311B45, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5ADFF2513F33AFA9ED70C79C5A4636204D8BB4040BF2C6C2470D0F20D8DC79D, cn=SUNANDA MOHANRAO GHADYALE
Date: 2026.01.07 18:34:33 +05'30'

**( सुनंदा मो. घड्याळे )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव.
३. प्रधान महालेखापाल-१ (लेखापरिक्षा) मुंबई, महाराष्ट्र.
४. प्रधान महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर, महाराष्ट्र.
५. महालेखापाल (लेखापरिक्षा) - १, मुंबई, महाराष्ट्र.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा) - २, नागपूर, महाराष्ट्र.
७. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई.
९. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई.
१०. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
११. निवडनस्ती / दिव्यांग कल्याण/कार्या-९.